**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.११९/२०१२ मधील नि.१६७ वरील आदेश</u>**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरूस्ती होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

<u>वादीच्या अर्जाची थोडक्यात हकीकत अशी की</u>,

०२. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे वाटप होऊन निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीने दावा कलम ८ मध्ये या न्यायालयातील नियमित दिवाणी दावा क्र.२२/१९८८ मधील हुकूमनाम्याबाबतची वस्तुस्थिती स्पष्टपणे नमुद केलेली आहे. परंतु, सदर दाव्यातील हुकूमनाम्याबद्दल न्यायालयाकडे विनंती करण्याचे दाव्यामध्ये नमुद करण्याचे राहून गेलेले आहे. तसेच, या दाव्यातील प्रतिवादी क्र.१ यांच्याकडून घरजागा मिळकत क्र.९९३ ही प्रतिवादी क्र.१० व विराज विश्वास उदावंत यांनी प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना खरेदी केलेली आहे. त्यामुळे सदर विराज उदावंत यांना या दाव्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. तसेच, प्रस्तावित दुरुस्तीसाठीच्या न्यायालयीन शुल्कामध्ये देखील बदल करणे आवश्यक असल्याने या अर्जामध्ये प्रस्तावित केलेल्या दुरुस्तीस परवानगी देण्याची विनंती केलेली आहे.

०३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.२, ३, ७, ८ व ९ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुर करण्यास हरकत नसल्याचे नमुद केले आहे.

०४. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी नि.१६९ प्रमाणे त्यांचे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला आहे. नमुद प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादींनी या अर्जामध्ये नमुद केलेली रु.१२,८४,११०/- ही रक्कम चुकीची आहे. तसेच, वादीने या अर्जामध्ये नमुद केलेला रु.१,८३,४४५/- चा हिशेबही चुकीचा आहे. त्याचबरोबर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.११ म्हणून सदर विराज यांना कशासाठी समाविष्ट करावयाचे याचा कुठलाही उल्लेख वादीने अर्जात केलेला नाही. सबब, प्रस्तावित दुरुस्तीस परवानगी दिली तर दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होत असल्याने प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

०५. प्रस्तुत अर्जासाठी वादीचे विद्वान विधिज्ञ श्री.एस.जी.लांबे व प्रतिवादी क्र.४ व ५ चे विद्वान विधिज्ञ श्री.आर.एम.उंडे यांचे म्हणणे ऐकले. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघाले व त्यासाठीचे उत्तर हे मी माझ्या कारणमिमांसासहीत खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ च्या अखत्यारीत येत आहे काय? | होय. |
| २. | काय आदेश? | अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र.१ व २ साठी</u> :-

०६. वादीच्या वादपत्राच्या कलम ०८ मध्ये वादीने नियमित दिवाणी दावा क्र. २२/१९८८ मधील हुकूमनामा कसा निरर्थक आहे याबाबत कथन केलेले आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे सदर हुकूमनामा हा व्यर्थ, निरर्थक व बेअंमल स्वरुपाचा असल्याने तो वादीवर बंधनकारक नाही असे घोषीत होऊन मिळणेबाबत मागणी करणे राहून गेलेले आहे. वर अगोदरच नमुद केल्याप्रमाणे वादीने वादपत्राच्या कलम ८ मध्ये सदर दिवाणी दाव्यातील हुकूमनाम्याबाबत विस्तृत वर्णन केलेले आहे. त्यामुळे वर नमुद प्रस्तावित दुरुस्तीस परवानगी दिली तर प्रतिवादींच्या हक्कावर त्याचा कुठलाही विपरित परिणाम होत नाही.

०७. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तुत दावा प्रलंबित असताना दावा मिळकतीपैकी घरजागा मिळकत क्रमांक ९९३ ही प्रतिवादी क्र.१० व विराज उदावंत यांनी विकत घेतलेली आहे. वादीने प्रस्तुत दाव्याद्वारे घर क्रमांक ९९३ मध्ये तिला हिस्सा मिळावा म्हणून मागणी केलेली आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील वादाचे पूर्णपणे निराकरण होणेसाठी सदर विराज उदावंत हे दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार ठरतात. वादीच्या दाव्यातील कथनाचा विचार करता, दोन्ही पक्षकारांमधील वादाचे पूर्णपणे निराकरण होण्यासाठी या अर्जामध्ये प्रस्तावित केलेल्या दुरुस्तीस परवानगी देणे न्यायोचित ठरेल.

०८.		प्रतिवादी क्र.४ व ५ च्या म्हणण्याप्रमाणे वादीने प्रस्तावित दुरुस्तीप्रमाणे दाव्याचे मुल्यांकन योग्य पध्दतीने केलेले नाही. परंतु, दावा दुरुस्तीच्या अर्जाचा निकाल करतेवेळी प्रस्तावित दुरुस्तीच्या गुणदोषावर चर्चा करणे आवश्यक व क्रमप्राप्त ठरत नाही. त्यामुळे या ठिकाणी प्रतिवादींच्या म्हणण्यास विशेष महत्व प्राप्त होत नाही.

०९.		प्रस्तुत दाव्याचे अवलोकन करता, दाव्यामध्ये अद्यापपावेतो संपरिक्षा सुरु झालेली नाही. त्यामुळे सदर अर्जातील प्रस्तावित दुरुस्तीस मंजूरी दिली तर दाव्यामध्ये कुठल्याही नविन गोष्टीचा समावेश होत नाही अथवा दाव्याचे मुळ स्वरुपही बदलत नाही. दोन्ही पक्षकारांमधील मुळ वाद हा स्थावर मिळकती संदर्भात असल्याने, दोन्ही पक्षकारांमधील वादांचे पूर्णपणे निराकरण होणेसाठी सदर दुरुस्तीस मंजूरी देणे या ठिकाणी योग्य व क्रमप्राप्त ठरते. म्हणून, मी मुदद्‌ा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत असून मुदद्‌ा क्र.२ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा नि.१६७ चा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. सदर अर्जात नमुद केलेली दुरुस्ती ही वादीने या आदेशापासुन १५ दिवसांच्या आत करावी.

३. अर्जाचा खर्च दाव्या सोबत आकारण्यात यावा.

( **प्र.ना.कुलकर्णी** )
२रे सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,
राहुरी, जि.अहमदनगर.

दिनांक: ०७/१०/२०१५